-: प्रकरण पहिले :-

# प्रस्तावना

## (Introduction)

# प्रकरण पहिले

## प्रस्तावना

(Introduction)

### १) सहकार : संकल्पना आणि व्याख्या :-

सहकार ही कल्पना मानवाच्या इतिहासाइतकी जुनी आहे. एखादे कार्य स्वतंत्रपणे, एकट्याने करण्यापेक्षा इतरांची मदत घेतल्यास ते अधिक चांगल्या प्रकारे आणि लवकर पूर्ण होते. याची कल्पना मानवाला शिकारी अवस्थेतच आली त्यामुळेच त्याच्या आर्थिक आणि सामाजिक आयुष्यात पुढे क्रांतीकारक बदल घडून आले.

मानवाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीची प्रमुख प्रेरणा त्याची 'सहकारी प्रवृत्ती' आहे असे म्हटले जाते. आदिमानवापासून ते वर्तमानकाळापर्यंत सहकारी प्रवृत्तीमुळे मानवाने आपली प्रगती करून घेतली आहे. प्रारंभीच्या काळी निसर्गाची अद्‌भूत कोडी समजून घेणे, नैसर्गिक आपत्तींना धैर्याने सामोरे जाणे, नैसर्गिक साधन सामुग्रीचा शोध घेणे, उत्पादन तंत्र व कौशल्य विकसित करणे अशा प्रत्येक कामात मानवाने सहकाराची कास धरली आहे.

सहकाराने केवळ मानव जातीच्या अस्तित्वालाच नव्हे तर मानवाच्या सर्वांगीण विकासाला फार मोठा हातभार लावलेला आहे. आधुनिक मानवी प्रगतीचा, विकासाचा आणि संस्कृतीचा इतिहास खरे पाहता मानवी सहकाराचा इतिहास आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

समाजसुधारक, समाजवादी विचारवंत, राजकीय विचारवंत, अर्थशास्त्र, समाजशास्त्र यांचा सहकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो. एखाद्या समाज सुधारकाच्या दृष्टीने

सहकार म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे साधन होऊ शकेल. एखाद्या लोकशाही समाजवाद्याच्या दृष्टीने सहकार म्हणजे वर्गविरहित संघर्ष आंदोलनातून साम्यवाद प्रस्थापित करण्याचा मार्ग ठरेल. एखाद्या राजकीय विचारवंताच्या दृष्टीने सहकार हे सत्ता संपादनाचे साधन ठरवले जाऊ शकते. अर्थशास्त्रज्ञाच्या दृष्टीने सहकारी संस्था हा एक व्यवसाय संघटनाचा प्रकार आहे तर समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टिने सहकार हे सामाजिक आंतरक्रियेचे एक रूप आणि एक सामाजिक प्रक्रिया आहे. (

सहकाराचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांनी आणि समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) <u>मेहता, व्ही. एल. यांनी सहकाराची केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे</u>,

**"समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, समान गरजा असणाऱ्या व्यक्तींची स्वइच्छेने संघटना स्थापन करण्यास प्रवृत्त करणारी एक चळवळ म्हणजे सहकार होय."**[१]

("Co-operation is a vast movement which promotes voluntary associations of individuals having common needs who combine towards the achievement of common economic ends" - Mehta V. L.).

२) <u>डॉ. फे. सी. आर. यांच्या मते</u>,

**"नि:स्वार्थी वृत्तीने व्यापार किंवा व्यवहार करण्यासाठी दुर्बल घटकांनी अस्तित्वात आणलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. तसेच सभासदांनी सहकारी संस्थेमार्फत केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात संस्थेच्या नफ्यात भागीदार होता येईल या अटींवर संस्थेचा कारभार चालविण्यात येतो"**[२]

("Co-operative society is an association for purposes of joint trading, originally among the weak and conducted always in an unselfish spirit on such terms that all who are prepared to assume the duties of membership may share its reward in preparation to the degree in which they make of use of organisation" - Dr. Fay, C. R.).

३) टिशलर, व्हायटन आणि हंटर या समाजशास्त्रज्ञांच्या मते,

"सहकार हे सामाजिक आंतरक्रियेचे असे रूप आहे कि, ज्यात समान हितसंबंधाच्या संवर्धनासाठी किंवा समान उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी लोक जेंव्हा एकत्रित काम करतात"[३]

("Co-operation is a form of social interaction in which people act together to promote common interests or achieve shared goals" - Tischler, Whitten and Hunter David).

४) डेव्हीड सील्स यांच्या मते,

"सर्वांना समान आस्था असणारे एखादे उद्दिष्ट गाठण्यासाठी किंवा सर्वांना समान पारितोषिक प्राप्त होईल अशा अपेक्षेने जेंव्हा लोक एकत्रित किंवा सामुहिक कृती करतात तेंव्हा त्याला सहकार असे म्हणतात.."[४]

("Co-operation is joint or collaborative behaviour that is directed toward some goal and in which there is common interest or hope of reward" - David L. Sills).

५) एच्. एफ्. रिडींग यांचे मतानुसार,

"सहकार्य म्हणजे समान उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी अस्तित्वात आलेले आंतरक्रियांची साखळी किंवा आंतरक्रियांचे जाळे होय. असे उद्दिष्ट कि जे सर्वांच्या एकत्रित कृतीमुळे सर्वांनाच प्राप्त होऊ शकते. एकट्या व्यक्तिला ते प्राप्त होऊ शकणारे नसते."[५]

("Co-operation is chain of interaction or network of interaction for achievement of common goal, the achievement possible to either all or none of the participants " - H. F. Reading).

६) **डब्ल्यू. पी. वॅटकीन यांच्या मते,**

**"एकता लोकशाही, समता आणि स्वातंत्र्य या तत्वावर आधारलेली सामाजिक संघटना म्हणजे सहकार होय"**[६]

("Co-operation is a system of social organisation based on the principles of unity, economy, democracy, equality and liberty" - Mr. W. P. Watkins).

वरील व्याख्यांवरून सहकाराच्या संकल्पनेत खालील मुलभूत घटक समाविष्ठ असल्याचे दिसून येते.

१) सहकार हे सामाजिक आंतरक्रियेचे रूप आहे.

२) सहकारामध्ये दोन किंवा अधिक व्यक्तींची आंतरक्रियात्मक साखळी निर्माण झालेली असते.

३) एखादे समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्या एकत्रितपणे किंवा सामूहिकरीत्या कार्यरत राहतात.

४) सर्वांचे उद्दिष्ट समान असते पण जेंव्हा त्यापैकी कोणत्याही एका व्यक्तीला स्वतंत्रपणे प्रयत्न करून ते साध्य करता येत नाही तेंव्हा सहकार्याचा मार्ग अवलंबिला जातो.

## २) भारतातील सहकारी चळवळीचा उदय आणि विकास :-

आज ज्या पद्धतीने संस्थात्मक सहकारी चळवळ दिसते तिचा उगम इंग्लंडमध्ये सन १८४४ मध्ये झाला. इंग्लंडमधील रॉशडेल या गावातील ४८ विणकाम कामगार एकत्र आले. या

कामगारांनी ''रॉशडेल सोसायटी ऑफ इक्विटेबल पायोनियर्स'' ही संस्था स्थापन केली. त्या काळात औद्योगिक क्रांती होत असतानाच तेथील अर्थव्यवस्था धोक्यात आली होती. सर्वत्र आर्थिक मंदीचे वातावरण होते. साठेबाजी आणि त्यामुळे वस्तूंची चणचण असे दुष्टचक्र चालू होते. या साऱ्या प्रकारात अल्प उत्पन्न असणारी मंडळी अधिकच त्रासून निघत होती. त्यामुळे कामगारांसारख्या त्यांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन आपली आर्थिक व अन्य गरजा भागविण्यासाठी वरील नावाची संस्था काढली. हीच सहकारी चळवळीची गंगोत्री मानली जाते. ''एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक'' अशी भूमिका ठेवली तरच सर्वांची आर्थिक उन्नती होऊ शकते. या भावनेने या सर्व लोकांनी कामास सुरूवात केली. स्वत: जवळचे अल्प आर्थिक बल, एकमेकांवरचा विश्वास आणि जीवनमान उंचावण्यासाठी लागणारी धडपड या त्रिसूत्रींच्या बळावर या मंडळींनी अत्यंत चांगले आणि यशस्वी काम केले.[७]

भारतीय सहकारी चळवळीची सुरूवात २५ मार्च १९०४ रोजी संमत केलेल्या कायद्याने झाली. सहकारी संस्था कायदा १९०४ हा भारतीय सहकार चळवळीच्या विकासातील एक महत्वाची घटना आहे. सहकारी चळवळीच्या विकासाची ही प्रायोगिक अवस्था मानली जाते. या विकासाच्या अवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्राथमिक सहकारी पतपुरवठा करण्यावर अधिक भर देण्यात आला.

सन १९०४ मधील सहकारी कायद्यातील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे :

१) एकाच खेड्यातील किंवा शहरातील कोणत्याही १० व्यक्तींना सहकारी संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्यात येईल.

२) सहकारी संस्थांचे वर्गीकरण दोन गटात करण्यात येईल १) शहरी व २) ग्रामीण.

३) ग्रामीण भागातील सहकारी संस्था अमर्यादित देयता तत्वानुसार स्थापन करण्यास परवानगी देण्यात येईल. शहरी सहकारी संस्थांना मात्र देयतीबद्दल निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात येईल.

४) सहकारी पत पुरवठा संस्था स्थापन करण्यास परवानगी देण्यात येईल.

५) सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र लहान ठेवण्यात येईल.

६) सभासदांना वैयक्तिक तारणावर तसेच इतर तारणांवर कर्जे देण्यात येतील.

७) एका सभासदास कमाल रू. १,०००/- पर्यंत भाग भांडवल खरेदी करण्यास परवानगी देण्यात येईल.

८) सहकारी संस्थेच्या हिशेब तपासणीच्या अधिकार रजिस्ट्रारकडे सोपविण्यात येईल.

९) सहकारी संस्थांना प्राप्तीकर स्टँपकर, रजिस्ट्रेशन फी इत्यादींत सुट देण्यात येईल.

१०) प्रत्येक राज्यात रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीची नियुक्ती करण्यात येईल.

११) सहकारी संस्थांना कायदेशीर व्यक्तिमत्व देण्यात येईल. त्यामुळे निधी जमा करून कर्ज देणे, व्यवसाय करणे शक्य होईल.

भारतातील सहकारी कायद्यामुळे सहकारी संस्था स्थापन करण्यास चालना मिळाली. याचा परिणाम म्हणजे सहकार चळवळ रूजण्यास मदत झाली.[८]

वाढत्या सहकारी संस्थांच्या संख्येबरोबर हा कायदा अपुरा वाटू लागला. कारण या कायद्याने फक्त कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांनाच परवानगी दिली होती. त्यामुळे इतर प्रकारच्या सहकारी संस्थांचा विकास होऊ शकला नाही. तसेच कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत करण्याकरिता काही मध्यवर्ती सहकारी संस्थांची स्थापना करण्याची तरतुद या कायद्यामध्ये नव्हती.

या प्रकारचे दोष व उणिवा लक्षात घेऊन सहकारी कायद्यात दुरूस्ती करण्याची आवश्यकता होती. तेंव्हा सन १९१२ मध्ये नवीन सहकारी कायदा करण्यात आला. या नवीन कायद्यामुळे भारतातील सहकारी चळवळीस उत्तेजन मिळाले. त्यामुळे सहकारी चळवळीचा नवा टप्पा सुरू झाला.[९]

सन १९१२ च्या नव्या कायद्यातील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

१) पतपुरवठा सहकारी संस्था व बिगर पत पुरवठा सहकारी संस्था यातील फरक संपुष्टात आला. आपल्या सभासदांचे आर्थिक हित साधण्याचे उद्दिष्ट असणाऱ्या व सहकारी तत्वे व धोरणे मान्य असणाऱ्या कोणत्याही सहकारी संघटनेस रजिस्ट्रेशन देण्याची सोय करण्यात आली.

२) सहकारी संस्थांचा संघ स्थापन करण्याची व संघाचे रजिस्ट्रेशन करण्याची सोय करण्यात आली. उदा. मध्यवर्ती सहकारी बँक.

३) मध्यवर्ती सहकारी बँका मर्यादित देयता तत्वानुसार स्थापन करता येतील. तथापि राज्य सरकारचा कोणताही अडथळा नसला पाहिजे.

४) ग्रामीण सहकारी संस्था मात्र 'अमर्यादित' देयता तत्वानुसार स्थापन करण्यात येतील.

५) सहकारी संस्थेच्या एका सभासदास जास्तीत-जास्त रू. १,०००/- इतके किंवा संस्थेच्या एकूण भागापैकी १/५ इतके भाग खरेदी करता येतील.

६) सभासदांकडून येणे असल्यास त्याचा भाग भांडवलावर तसेच ठेवीवर सहकारी संस्थेची मालकी ठेवण्यात येईल.

७) सहकारी संस्था प्राप्तीकर, स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन फी यांत सुट देण्याचा निर्णय राज्य शासन घेईल.

८) सहकारी संस्थांनी दरवर्षी मिळणाऱ्या नफ्यापैकी २५% नफा राखीव निधीच्या स्वरूपात जाम करावा.

९) हिशेब तपासणी व तत्संबंधीत तरतुदी पूर्वीप्रमाणेच कायम ठेवल्या.

थोडक्यात १९०४ च्या कायद्यात सुधारणा करून १९१२ चा सहकारी संस्था कायदा संमत करण्यात आला व तो सहकार चळवळीच्या विकासास पोषक ठरला. सहकार क्षेत्राची व्याप्ती अधिकच रूंदावली. पतपुरवठ्या बरोबरच अन्य क्षेत्रातही सहकारी संस्था निघू लागल्या. शेतमालाची विक्री, शेती अवजारे, खतांची खरेदी, इतर आवश्यक वस्तूंची खरेदी याकरिता सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या. मध्यवर्ती सहकारी संस्थांची निर्मिती झाली.

इ. स. १९१९ पर्यंत सहकार हा विषय केंद्र सरकारच्या क्षेत्रात होता. भारत सरकारने १९१९ मध्ये सुधारणा कायदा संमत केला या कायद्यान्वये 'सहकार' हा विषय राज्य सरकारच्या अधिकारात वर्ग करण्यात आला. थोडक्यात याचा अर्थ सहकारी चळवळीस चालना देण्याची जबाबदारी राज्य शासनावर सोपविण्यात आली. या काळात भारतातील सहकारी चळवळीस बरीच चालना मिळाली.[१०]

## ३) महाराष्ट्रातील सहकार चळवळ : आढावा :-

महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातच सहकारी चळवळीची सुरूवात झाली. इ. स. १८८९ मध्ये बडोदा शहरात मध्यम वर्गीय महाराष्ट्रीयन लोकांनी सुरू केलेली सहकारी अन्योन्य मंडळी ही संस्था भारतातील पहिला सहकारी संस्था होय. इ. स. १९२५ मध्ये मुंबई सहकारी संस्था कायदा संमत करण्यात आला.

महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच खेड्यातील बहुतांश शेतकऱ्यांना या चळवळीचा लाभ झाल्याने सहकारी चळवळीला महत्व प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात झालेली सहकारी चळवळीची प्रगती नेत्रदीपक आहे. सहकारी चळवळीच्या या विकासामुळे महाराष्ट्र राज्य भारतात सर्वत्र प्रशंसा-पात्र ठरला आहे. सहकारी चळवळ व्यापक दृष्टीकोनातून प्रभावी ठरावी म्हणून १९६० मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा संमत करण्यात आला. इ. स. १९८६ मध्ये या कायद्यात

दुरूस्त्या करण्यात आल्या. एकूण ६८ कलमांमध्ये सुधारणा केल्या व अनेक पोटकलम नव्याने वाढविण्यात आली.

महाराष्ट्रात विविध प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वात आहेत. त्यात प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, सहकारी कृषी पत पुरवठा संस्था, सहकारी दुग्ध योजना, ग्राहक सहकारी संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी खरेदी-विक्री संस्था, सहकारी मत्स्य व्यवसाय संस्था, मजुरांच्या सहकारी संस्था, विणकर सहकारी संस्था, सहकारी सुतगिरणी, वनश्रमिक सहकारी संस्था, जंगल कामगार सहकारी संस्था, आदिवासी विकास सेवा सहकारी संस्था याशिवाय औद्योगिक सहकारी संस्था, भात गिरण्या, तेल गिरण्या, कुक्कुट पालन, रेशीम उद्योग, छपाई उद्योग, प्रक्रिया संस्था, शेती सोसायट्या, उपसा जलसिंचन योजना, वाहतूक संस्था, चित्रपट संस्था, पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था आदींचा समावेश होतो.[११]

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या संख्यात्मक प्रगतीचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने राज्याच्या विशेषतः ग्रामीण भागाच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये महत्वाची आणि प्रभावी भूमिका बजावली आहे. सुरूवातीला ही चळवळ प्रामुख्याने कृषी पतपुरवठ्याच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. त्यानंतर ही चळवळ शेतीमाल प्रक्रिया, शेतमाल पणन, ग्रामीण भागातील उद्योग, ग्राहक भांडारे, सामाजिक सेवा इ. सारख्या इतर क्षेत्रात वेगाने पसरली. याचा परिणाम ग्रामीण भागातील जनतेचे राहणीमान लक्षणीय रीत्या उंचावण्यात झाला आहे. निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांची वर्ष १९९९ पर्यंतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### १) <u>शिखर व मध्यवर्ती पतसंस्था</u> :-

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ठेवी मार्च २००० अखेर ८,१०० कोटी रूपये होत्या. खेळते भांडवल रू. ११,४४४ कोटी, भाग भांडवल व निधी ८३४ कोटी रू. कर्ज वाटप, ६,७४० कोटी रू. गुंतवणूक २९,९९३ कोटी रू. आणि नफा ११६ कोटी रू. इतका झाला आहे.

२) **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका** :-

दि. ३१ मार्च १९९९ रोजी राज्यातील ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकातील ठेवीमध्ये १९९८ च्या तुलनेमध्ये २३.५% इतकी भरीव वाढ होऊन त्या १३,१४६ कोटी रूपये झाल्या, या बँकाचे खेळते भांडवल १७,४८७ कोटी इतके रूपये होते आणि ते दि. ३१ मार्च १९९८ रोजीच्या १४,११९ कोटी रूपयांच्या तुलनेत २१.३ % नी जास्त होते. या बँकांची येणे कर्जाची रक्कम ८,७५२ कोटी रूपये होती व मागील वर्षीच्या अशा रकमेपेक्षा २१.७ टक्क्यांनी जास्त होती. या बँकांची ३० जून १९९८ आणि दि. ३० जून १९९९ रोजी वसुलीपात्र कर्जाची रक्कम अनुक्रमे २,५२१ कोटी आणि ३,०५७ कोटी रूपये इतकी होती. दि. ३० जून १९९९ रोजी संपलेल्या वर्षात १,७२७ कोटी रूपयांची कर्ज वसुली झाली. ही वसुली १९९७-९८ मधील वसुलीपेक्षा २७% जास्त होती. कर्ज वसुलीचे वसुलीपात्र रकमेशी प्रमाण १९९८-९९ मध्ये ५६.५% होते. १९९७-९८ मध्ये हेच प्रमाण ५३.९% होते. दि. ३१ मार्च १९९९ रोजी कर्जाच्या थकबाकीची रक्कम १,९०० कोटी रूपये होती व थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण २१.७% होते. तर हे प्रमाण मागील वर्षामध्ये २२.५% होते.

३) **महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक** :-

या बँकेने १९९८-९९ या वर्षात ३.९५ कोटी रूपयांचे कर्जरोखे विक्रीस काढले. या बँकेने १९९८-९९ मध्ये ४० कोटी रूपयांची दिर्घ मुदतीची कर्जे दिली. ३० जून १९९९ रोजी बँकेची थकबाकी २८१ कोटी रूपये होती. १९९७-९८ मध्ये बँकेने १०१ कोटी रूपयांची दिर्घ मुदतीची कर्जे दिली होती. तर मागील वर्षी त्याच कालावधीत बँकेत १९ कोटी रूपयांची दिर्घ मुदतीची कर्जे दिली होती.

४) **अपेक्स को-ऑप. बँक अर्बन बँक्स ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा लि., मुंबई** :-

मार्च २००० अखेरीस अपेक्स बँकेचे सभासद २४७ असून त्यात महाराष्ट्र शासन १७४ नागरी बँका, ५५ इतर सोसायट्या, १३ साखर कारखाने आणि ४ सुतगिरण्या यांचा समावेश

आहे. मार्च २००० अखेर बँकेचे भाग भांडवल रू. ५१.८० कोटी, राखीव निधीस १७.६६ कोटी ठेवी रू. ५८६.२९ कोटी आणि उत्पन्न रू. ६.४० कोटी या प्रमाणात असल्याचे दिसून येते. आर्थिक वर्षात बँकेने ३६४ कोटी रूपयांचे कर्जवाटप केले आहे.

५) **महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ** :-

या महामंडळाची सभासद संख्या दि. ३१ मार्च १९९९ रोजी जवळपास १२,००० होती. या महामंडळाची दि. ३१ मार्च १९९९ रोजी ठेवीची रक्कम ३५ कोटी रूपये होती आणि दि. ३१ मार्च १९९८ रोजीच्या ठेवींच्या तुलनेत त्यामध्ये ३६% नी घट झाली. या महामंडळाचे खेळते भांडवल ४६७ कोटी रूपये होते आणि ते मागील वर्षामधील खेळत्या भांडवलापेक्षा थोडे जास्त होते. १९९८-९९ दिलेल्या कर्जाच्या रकमेमध्ये ४२.४ टक्क्यांनी घट झाली व ही रक्कम ५.१ कोटी रूपये होती. १९९७-९८ मध्ये कर्जाची ही रक्कम ९ कोटी रूपये इतकी होती.

६) **प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्था** :-

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था या मूळ स्तरावरील सहकारी पतपुरवठा संस्था असून अल्प मुदतीच्या कर्जाचे वितरण ग्रामीण भागामध्ये प्रभावीपणे करण्यामध्ये त्याची भूमिका महत्वाची आहे. राज्यात ३१ मार्च १९९९ रोजी २०,३५४ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था होत्या आणि त्याची सभासद संख्या १.१ कोटी होती. या संस्थामध्ये कृषक सेवा संस्था, आदिवासी सहकारी संस्था व धान्य बँका यांचाही समावेश आहे. या संस्थांचे खेळते भांडवल ४,०९६ कोटी रूपये होते व ते मागील वर्षातील खेळत्या भांडवलापेक्षा ०.६% नी जास्त होते. या संस्थांनी १९९८-९९ या वर्षी २,२३६ कोटी रूपयांचा कर्जपुरवठा केला. कर्जाच्या थकबाकीची रक्कम दि. ३१ मार्च १९९९ रोजी १,१६४ कोटी रूपये होती. थकबाकीचे येणे रक्कमेशी प्रमाण दि. ३१ मार्च १९९९ रोजी ३४.५% इतके होते हे प्रमाण मागील वर्षीच्या (३९.५%) तुलनेत कमी होते. एकूण थकबाकी पैकी ५२% थकबाकी दोन वर्षापेक्षा कमी कालावधी करिता होती. एकूण प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थापैकी आदिवासी

सहकारी संस्थांची संख्या ९८४ होती. या संस्थांनी १९९८-९९ मध्ये ७६ हजार सभासदांना ४२ कोटी रूपयांचे कर्ज वाटप केले, तर या अगोदर च्या वर्षी ७५ हजार सभासदांना ४१ कोटी रू. कर्जवाटप केले होते.

७) **बिगर-कृषी पतपुरवठा संस्था** :-

दि. ३१ मार्च १९९९ रोजी राज्यातील प्राथमिक बिगर कृषी पतपुरवठा संस्थांची संख्या १९८६२ होती. या संस्थांची सदस्य संख्या १.७ कोटी होती. दि. ३१ मार्च १९९९ रोजी ठेवी १६,८८० कोटी रूपये होत्या. सन १९९८-९९ अखेर या संस्थाचे खेळते भांडवल २६,७५६ कोटी रूपये होते.

८) **सहकारी पणन संस्था** :-

सहकारी पणनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शेतकऱ्यांचे व्यापाऱ्यापासून होणारे शोषन टाळणे व शेती उत्पादनाच्या खरेदी व विक्रीची व्यवस्था करून शेतकऱ्यास वाजवी भाव मिळवून देणे, त्याचप्रमाणे ग्राहकास वाजवी किंमतीमध्ये चांगल्या प्रतीचा माल उपलब्ध करून देणे हे आहे. ही उद्दिष्टे लक्षात घेऊन सहकारी पणन संस्थांना भागभांडवल व कर्ज या स्वरूपात अर्थ साहाय्य दिले जाते. जिल्हा/मध्यवर्ती पणनसंस्था आणि पणन महासंघ धरून सहकारी पणनसंस्थांची एकूण संख्या मार्च १९९९ अखेर १,०५५ होती. या संस्थांची सभासद संख्या ८.३२ लाख आणि खेळते भांडवल ४३९ कोटी रूपये होते.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे खेळते भांडवल दि. ३१ मार्च १९९९ रोजी १६४ कोटी रूपये हाते. या महासंघाची १९९८-९९ मधील एकूण उलाढाल ३९५ कोटी रूपये होती व त्यामध्ये शेतीविषयक साधनांचा वाटा ९८% होता.

## ९) कापूस एकाधिकार खरेदी योजना :-

सन १९९९-२००० हंगामातील कापूस खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघामार्फत तसेच कापसाच्या प्रत्येक वाणाच्या प्रतवारी मागील हंगामाप्रमाणे दोन ग्रेडस्‌मध्ये करण्याऐवजी प्रत्येक वाणाची कापसाकरिता क्वॉलिटी ३ ग्रेडमध्ये करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे खेळते भांडवल दि. ३१ मार्च १९९९ रोजी २३ कोटी रूपये होते. या महासंघाची १९९७-९८ मधील एकूण उलाढाल १,८४८ कोटी रूपये होती तर १९९६-९७ मध्ये ती ३,००७ कोटी रू. होती. सन १९९९-२००० या हंगामात २३ फेब्रुवारी २००० पर्यंत ३,४९८.२६ कोटी रूपये किंमतीचा १६४.३९ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला.

## १०) सहकारी सुत गिरणी :-

महाराष्ट्र राज्यामध्ये १९९८-९९ अखेर एकूण २२६ सहकारी सुतगिरण्या होत्या. त्यापैकी फक्त ६७ गिरण्या उत्पादन करीत होत्या व त्यांच्याकडील चात्यांची संख्या २४.४३ लाख होती. या गिरण्यांनी १९९८-९९ मध्ये ४९८ कोटी रू. किंमतीच्या सुताचे उत्पादन केले.

## ११) सहकारी हातमाग संस्था :-

महाराष्ट्र राज्यामध्ये १९९८-९९ अखेर ७२८ सहकारी हातमाग संस्था व ७९८ सहकारी यंत्रमाग संस्था होत्या. या संस्थांकडे असलेल्या चालू स्थितीतील हातमागांची व यंत्रमागांची संख्या अनुक्रमे ५१ हजार व ४६ हजार होती. १९९८ मध्ये हातमागसंस्थांनी ८२ कोटी रू. किंमतीचे आणि यंत्रमाग संस्थांनी २९५ कोटी रूपये किंमतीचे कापड उत्पादित केले. सन १९९७-९८ मध्ये यांच्या उत्पादित कापडाचे मुल्य अनुक्रमे ८६ कोटी व २९० कोटी रू. होते.

## १२) <u>प्राथमिक सहकारी दूध संस्था</u> :-

राज्यात सन १९९८-९९ मध्ये २०,५१० प्राथमिक सहकारी दूध संस्था व ६३ दुग्ध संघ होते आणि त्यांची सदस्य संख्या अनुक्रमे १८.७० लाख व २.७३ लाख होती. या दूध संस्था व दुग्ध संघ यांचे खेळते भांडवल अनुक्रमे ३७३ कोटी रूपये आणि ५६९ कोटी रू. होते. १९९८-९९ मध्ये दुग्ध संस्थांनी विक्री केलेल्या दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीची एकत्रित किंमत १,०४७ कोटी रूपये आणि दुग्धसंघाची २,१०० कोटी रू. होती. १९९७-९८ मध्ये ती अनुक्रमे ९६४ कोटी रूपये आणि १,९८६ कोटी रू. होती.

## १३) <u>सहकारी मत्स्य व्यवसाय संस्था</u> :-

राज्यात १९९८-९९ मध्ये २,२४५ प्राथमिक सहकारी मत्स्य व्यवसाय संस्था, ३१ मत्स्य व्यवसाय संघ आणि एक मत्स्य व्यवसाय महासंघ कार्यरत होता. या सर्व संस्थांची सदस्य संख्या २.४६ लाख होती. या संस्थांचे खेळते भांडवल २२७ कोटी रूपये होते. त्यांनी मासळी व मासळी पासूनची उत्पादने यांच्या केलेल्या विक्रीची किंमत १०९ कोटी रूपये होती. १९९७-९८ मध्ये अशा विक्रीची किंमत १०० कोटी रूपये होती.

## १४) <u>कुक्कुट विकास सहकारी संस्था</u> :-

सुधारित जातींच्या पक्षांच्या संस्थेत अलिकडच्या काळात लक्षणीय वाढ झालेली आहे. कुक्कुट विकासाचा कार्यक्रम प्रामुख्याने चार मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे, १६ सधन कुक्कुट विकास गट आणि २ कुक्कुट विस्तार केंद्रे याद्वारे राबविला जातो. या केंद्रांनी १९९८-९९ मध्ये पुरवठा केलेल्या पक्षांची संख्या १०.५७ लाख इतकी होती. तर १९९७-९८ मध्ये ती ९.९३ लाख होती. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांच्या अर्थ सहाय्याने सहकारी तत्वावर कुक्कुट पालन करणारी संस्था स्थापन करण्याची योजना राज्यात १९८५-८६ पासून कार्यान्वीत आहे. १९८५-८६ ते

१९९८-९९ या कालावधीत शासनाने अशा एकूण ७४ सहकारी कुक्कुट पालन संस्थांच्या प्रकल्पांन मंजूरी दिली आणि त्यापैकी ७० प्रकल्प सध्या कार्यरत आहेत.

## १५) <u>समाजसेवी आणि इतर सहकारी संस्था</u> :-

अ) राज्यात १९९८-९९ अखेर शिखर ग्राहक महासंघाव्यतिरिक्त १४४ घाऊक ग्राहक भांडारे व ३५५३ प्राथमिक ग्राहक भांडारे होती. १९९८-९९ मधील सर्व ग्राहक भांडारांची एकूण विक्री ८९३ कोटी रूपये होती. शिखर ग्राहक महासंघाची १९९८-९९ मधील एकूण विक्री ५८ कोटी रूपये होती तर १९९७-९८ मध्ये ती ४० कोटी रूपये होती.

ब) दि. ३१ मार्च १९९९ अखेर राज्यात ४८,५१४ सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या आणि त्यांची सदस्य संख्या १७.७३ लाख होती. घरबांधणीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तपुरवठा महामंडळाकडून कर्ज मंजूर करण्यात आलेल्या सदनिकांची एकूण संचयी संख्या दि. ३१ मार्च १९९९ रोजी २.१५ लाख होती. त्यापैकी जवळ जवळ १.०८ लाख सदनिका ह्या दिनांकापर्यंत बांधून पूर्ण करण्यात आल्या होत्या.

क) राज्यात १९९८-९९ च्या अखेरीस कंत्राटी पद्धतीवर काम घेणाऱ्या मजूरांच्या सहकारी संस्थांची संख्या ७,०९९ होती व सभासदांची संख्या ४.४ लाख होती. १९९८-९९ या वर्षामध्ये या सहकारी संस्थांनी ३८१ कोटी रूपयांची कामे केली तर १९९७-९८ मध्ये ३७८ कोटी रूपयांची कामे करण्यात आली होती.

ड) राज्यात १९९८-९९ अखेर २९२ वनश्रमिक संस्था होत्या व त्यांच्या सभासदांची संख्या ७४ हजार होती. १९९८-९९ मध्ये या संस्थांनी लाकूड व इतर वन उत्पादनांची केलेली विक्री २६ कोटी रूपये होती.

राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची एकत्रित संख्या दि. ३१ मार्च २००० अखेर १,५२,६१९ इतकी होती. ४ कोटी १४ लाख सभासद, ४,५६० कोटी रूपयांचे भांडवल, ३५,३११ कोटी रूपयांच्या ठेवी. ७०,५०१ कोटी रूपयांचे खेळते भांडवल अशी राज्याची आकडेवारी आहे.[१२]

उत्तमराव यादव यांनी महाराष्ट्रातील चळवळीच्या बाबतीत असे म्हटले आहे की,

''महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला जे खंबीर व गतीमा नेतृत्व लाभले त्यामध्ये कै. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री वि. खे. पाटील, डॉ. वसंतराव दादा पाटील, तात्यासाहेब कोरे, राजाराम बापू पाटील इ. सारख्या सहकार महर्षींनी पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला वाहून घेतले होते. त्याचबरोबर गो. कृ. गोखले, विठ्ठलदास ठकारसी, न. चि. केळकर, युनिलाल मेहता, द. को. कर्वे, रमणभैय्या सरैय्या, वा. पु. वर्दे, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, डॉ. पंजाबराव देशमुख, यशवंतराव चव्हाण, शंकरराव मोहिते, शंकरराव काळे, शरद पवार यांसारख्या नेतृत्वांनी चळवळीस गती दिली आहे. या चळवळीच्या यशास व प्रगतीस हातभार लावलेला आहे.

त्यांनी ''विनासहकार नही उद्धार'' या उद्घोषाने लोकांना प्रेरित केले आणि सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळवून दिली. महाराष्ट्रात १९०४ मध्ये सहकारीकरणाला सुरूवात झाली. परंतू १९४८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगरच्या महाराष्ट्रातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेपासून या चळवळीला खऱ्या अर्थाने गती प्राप्त झाली आणि पश्चिम महाराष्ट्रात त्यानंतर सहकार क्रांती झाली.''[१३]

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या बाबतीत ॲड. अशोकराव गजरे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ) असे म्हणतात की, ''महाराष्ट्रात सहकारी संस्थांच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढही झालेली आहे. परंतु ती विशिष्ठ क्षेत्रापुरतीच मर्यादित आहे. ती सर्वच

क्षेत्रात होणे गरजेचे आहे. यासाठी सहकारी मूल्यांची, कायदा, नियम, पोटनियमांची जोपासना सर्व सहकारी संस्थांनी करून योग्यप्रकारे पालन करण्याची आज खरी गरज आहे; सहकारातून लोकांना सामर्थ्य प्राप्त करून देणे या ध्येयाने कार्य करावे ही सहकारी सप्ताहामागील भूमिका सहकारी संस्था, सहकारी कार्यकर्ते, सेवक व अधिकारी यांनी लक्षात घ्यावी. विविध क्षेत्रामध्ये, आर्थिक क्षेत्रामध्ये सहकारी चळवळीने यशस्वीपणे पदार्पण केलेले आहे. महाराष्ट्रातील कांही सहकारी संस्थांनी केलेली प्रगती अत्यंत स्पृहणीय व नेत्रदीपक असून या चळवळीचे कार्य इतर राज्यातील सहकारी संस्थांना अनुकरणीय आहे.''

सहकारी संस्था ह्या व्यावसायिक संघटना असल्या तरी सामाजिक बांधीलकी व समाज परिवर्तनाचे उद्दिष्ट देखील त्यांचे समोर असते. व्यवसाय तत्वे व सहकारी संस्था यशस्वी करण्याचे कार्य अत्यंत कठीण आहे. सहकारी चळवळीला अनेकविध अडीअडचणीतून मार्ग काढून आपले कार्य करावयास लागते. हितसंबंधी लोकांपासून तिचे संरक्षण करून समाजातील दुर्बल घटकांच्या व मागासलेल्या घटकांच्या कल्याणासाठी सहकारी चळवळ समर्थ बनविणे आवश्यक आहे. व या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील चळवळीचे कार्य अभिमानास्पद आहे.[१४]

महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे प्रकार व त्यांची संख्यात्मक प्रगती दाखविणारी आकडेवारी खालील सारणीत नोंदविली आहे.

## सारणी क्रमांक १.१
## महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे प्रकार व त्यांची प्रगती दाखविणारी आकडेवारी (१९६१-२०००)

| अ. क्र. | सहकारी संस्थांचे प्रकार | साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १९६१ | १९८१ | १९९१ | १९९९ | २००० |
| १ | राज्यस्तरीय शिखर सहकारी संस्था | २५ | ३१ | ३१ | ३२ | ३२ |
| २ | प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था | २१,४०० | १८,५७७ | १९,५६५ | २०,३५४ | २१,७२५ |
| ३ | बिगरकृषी सहकारी पतसंस्था | १६४४ | ५४७४ | ११,२९४ | १९,८६४ | २०,३४५ |
| ४ | पणन संस्था | ३४४ | ४२३ | ९३१ | १०५५ | १०६३ |
| ५ | उत्पादक उपक्रम (साखर कारखाने, भातगिरण्या, दुग्धसंस्था इ.) | ४३०६ | १४,३२७ | २८,९५४ | ३७,८७२ | ३९,७६२ |
| ६ | समाजसेवी व इतर सहकारी संस्था (ग्राहक भांडारे, गृहनिर्माण सहकारी संस्था) | ३८४६ | २१,९१५ | ४३,८४१ | ६७,४६४ | ६९,६९२ |
| एकूण | | ३१,५६५ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,४६,६४१ | १,५२,६१९ |

आधार :

१) गजरे, अशोकराव : ''महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेप'', सहकारी विश्व विशेषांक, डिसेंबर १९९९ पान नं. ५.

२) प्रा. स. वि. सोवनी : ''महाराष्ट्रातील कृषी विकासात प्राथमिक शेती सहकारी संस्थांचे योगदान'', ''अर्थमंथन'', सकाळ प्रिंटीग प्रेस पूणे, वर्ष ९ वे, अंक २२, २ एप्रिल ते ८ एप्रिल २००१, पान नं. १५.

वरील प्रमाणे महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे प्रकार व त्यांची प्रगती दाखविणारी आकडेवारी सारणी क्रमांक १.१ मधून स्पष्ट होते. महाराष्ट्र राज्यामध्ये सन २००० अखेर १,५२,६१९ इतक्या सहकारी संस्था असल्याचे दिसून येते.[१५]

## सारणी क्रमांक १.२

## महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळींची प्रगती सांगणारी आकडेवारी (१९६०-६१ ते १९९९-२०००)

| अ. क्र. | वर्षे | १९६०-६१ | १९७०-७१ | १९९५-९६ | १९९९-२००० |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहकारी संस्थांची संस्था | ३१,५६५ | ४२,६०२ | १,३९,०८९ | १,५२,६१९ |
| २ | सभासद संख्या (लाख रू) | ४१.९५ | ८५.८१ | ३६९.०० | ४१४.०० |
| ३ | खेळते भांडवल (कोटी रू) | २९१ | १४९० | ४७,८१६ | ७०,५०१ |

आधार :

१) प्रा. स. वि. सोवनी : ''प्राथमिक रोजी सहकारी संस्थांचे महाराष्ट्रातील कृषीविकासात योगदान'', ''अर्थमंथन'', सकाळ प्रिंटीग प्रेस पूणे, वर्ष ९ वे, अंक २१, , संपादक - प्रीाकर चिंतामण खोजे, मुद्रक व प्रकाशक - श्रीमती लीला पराडकर, २६ मार्च ते १ एप्रिल २००१ पान नं. १५.

वरीलप्रमाणे महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची प्रगती दर्शविणारी माहिती आहे. महाराष्ट्र राज्यात दि. ३१ मार्च २००० अखेर १,५२,६१९ सहकारी संस्था असून त्यांची सभासद संख्या ४१४.०० लाख आहे व खेळते भांडवल ७०,५०१ कोटी रू. आहे. यावरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विस्ताराचा अंदाज येतो.[१६]

### ४) कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा विस्तार :-

ज्याप्रमाणे भारतात महाराष्ट्र राज्य त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात कोल्हापूर जिल्हा सहकारी चळवळीच्या यशाबद्दल प्रसिद्ध आहे. कोल्हापूर जिल्ह्यात १२ तालुके असून या सर्वच तालुक्यात सहकार चळवळ फोफावली आहे. खाली दिलेल्या सारणी क्र. १.३ मध्ये दि. ३१ मार्च २००० अखेर कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण सहकारी संस्थांची आकडेवारी दिली आहे. तसेच सारणी क्र. १.४ मध्ये दि. ३१ मार्च १९९९ अखेर जिल्ह्यातील तालुकानिहाय वर्गवार एकूण सहकारी संस्थांची आकडेवारी पहावयास मिळते.

या आकडेवारीवरून कोल्हापूर जिल्ह्यात सहकार चळवळ किती विस्तारीत झाली आहे याची कल्पना येण्यासारखी आहे.

**सारणी क्रमांक १.३**

**दिनांक ३१ मार्च २००० अखेर कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण सहकारी संस्थांचा तक्ता**

| अ. क्र. | संस्थेचा प्रकार | ३१/३/९९ | अ. क्र. | संस्थेचा प्रकार | ३१/३/९९ |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | १ | २ | प्राथ. शेती पत पुर. संस्था (वि.का.स.) | १५०५ |
| ३ | धान्य बँक | १६ | ४ | प्राथमिक सहकारी नागरी बँक | ६२ |
| ५ | नागरी पतपुरवठा संस्था | २१५८ | ६ | नोकरदारांच्या पत पुर. संस्था | २९४ |
| ७ | पणन संस्था (मार्केटिंग संस्था) | ५४ | ८ | साखर कारखाने | १७ |
| ९ | प्रक्रिया संस्था | ६० | १० | शेती संस्था | १५ |
| ११ | उपसा जलसिंचन संस्था | ५४१ | १२ | हातमाग सहकारी संस्था | १४ |
| १३ | यंत्रमाग सहकारी संस्था | ३१८ | १४ | औद्योगिक सहकारी संस्था | २१० |
| १५ | सूत गिरण्या | ४६ | १६ | औद्योगिक वसाहत संस्था | १७ |
| १७ | ग्राहक भांडारे | २४६ | १८ | गृहनिर्माण संस्था | ५६६ |
| १९ | मजूर संस्था | ९४ | २० | महिला सहकारी संस्था | ८८ |
| २१ | वाहतूक संस्था | ६३ | २२ | इतर सहकारी संस्था | १०९ |
| २३ | फेडरेशन | १२ | | | |
| २४ | मध्यवर्ती दुध पुरवठा संस्था | ३ | २५ | प्राथमिक दूध पुरवठा संस्था | २७५२ |
| २६ | प्रशु संवर्धन व पशु उत्पन्न संस्था | २६५ | २७ | प्राथमिक संस्था व कुक्कुटपालन संस्था | ६७ |
| २८ | मच्छिमार संस्था | २२ | | | |
| | | | | **एकूण** | **९६१५** |

आधार :

१) मा. चंद्रकांत जोती वाडेकर : ''कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ'', ''सांख्यिकी माहिती पुस्तिका सन १९९९'' तसेच ''५३ वा वार्षिक अहवाल सन १९९९-२०००'', कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बोर्ड लि. कोल्हापूर, पान नं. २.

सारणी क्रमांक १.३ वरून असे दिसून येते की, ३१ मार्च, २००० अखेर कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ९,६१५ सहकारी संस्था आहेत.

## सारणी क्रमांक १.४ : दिनांक ३१-३-१९९९ अखेर जिल्ह्यातील तालुकानिहाय वर्गवार संस्थांचा तक्ता (कोल्हापूर जिल्हा)

| अ. क्र. | संस्था प्रकार | आजरा | भुदरगड | चंदगड | गडहिंग्लज | ग. बावडा | हातकणंगले | कागल | पन्हाळा | राधानगरी | शाहूवाडी | शिरोळ | करवीर | को. शहर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जिल्हा मध्यवर्ती सह. बँक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| २ | प्राथ. शेती पतपुरवठा | ६२ | ११८ | १०१ | ८३ | ३९ | १०८ | १२९ | १६९ | १४४ | ८० | १२९ | २१३ | - | १३७५ |
| ३ | धान्य बँक | - | ५ | १ | - | - | - | ६ | - | २ | १ | - | १ | - | १६ |
| ४ | प्राथमिक सह. नागरी बँक | २ | - | १ | ३ | - | २३ | ३ | ३ | - | - | ७ | २ | १८ | ६२ |
| ५ | नागरी पत पुरवठा | १३३ | २५ | ८९ | १३६ | ७ | ३६१ | १६१ | १४७ | १३८ | ७० | १४० | २०९ | २६८ | १९८४ |
| ६ | नोकरदारांच्या पतपुरवठा | ११ | १८ | ११ | १३ | १ | ३९ | १५ | १३ | ५ | ७ | १८ | १४ | १०९ | २७४ |
| ७ | पणन संस्था | १ | २ | २ | ६ | १ | २ | ३ | ७ | ३ | १ | ६ | ८ | ९ | ५१ |
| ८ | साखर कारखाने | १ | - | १ | १ | १ | २ | ३ | २ | १ | १ | १ | २ | १ | १७ |
| ९ | प्रक्रिया संस्था | १ | २ | २ | - | - | ४ | १३ | १९ | ४ | - | २ | - | ४ | ५१ |
| १० | शेती संस्था | १ | १ | - | - | - | ३ | - | १ | १ | २ | २ | २ | - | १३ |
| ११ | उपसा जलसिंचन संस्था | १९ | २१ | १२ | ९ | ८ | ८४ | ६१ | ८८ | ५९ | ११ | ४८ | १२१ | - | ५४१ |
| १२ | हातमाग सहकारी संस्था | - | १ | - | - | - | ८ | २ | १ | - | १ | - | - | ४ | १७ |
| १३ | यंत्रमाग सहकारी संस्था | - | - | - | ३ | - | २१४ | - | - | - | १ | १८ | २ | - | २३८ |
| १४ | औद्योगिक सहकारी संस्था | १३ | ९ | ४ | ३ | २ | ५६ | ३८ | ९ | १२ | ७ | ८ | १९ | १६ | १९६ |
| १५ | सूतगिरण्या | २ | २ | १ | २ | - | २१ | ४ | ३ | १ | - | ५ | २ | ४ | ४७ |
| १६ | औद्योगिक वसाहती | - | - | - | १ | - | ९ | - | २ | १ | - | ७ | - | १ | १५ |
| १७ | ग्राहक भांडारे | १७ | ११ | १२ | ४ | २ | ९० | ११ | १३ | १० | ४ | १४ | २४ | ६३ | २७५ |
| १८ | गृहनिर्माण संस्था | ४ | ९ | २ | ११ | - | १०३ | ११ | ५ | ८ | १ | ४३ | ७४ | २९१ | ५६२ |
| १९ | मजूर संस्था | २ | २ | १ | ३ | १ | १८ | ६ | ८ | ४ | ५ | ४ | ६ | २१ | ८१ |
| २० | महिला सह. संस्था | ३ | - | - | ३ | १ | ४ | - | ९ | - | १ | १६ | ६ | ८ | ८७ |
| २१ | वाहतूक संस्था | - | १८ | ३ | - | - | - | ४ | २ | १२ | - | - | २ | ९ | ५० |
| २२ | इतर सहकारी संस्था | १ | २ | १ | १ | - | १३ | - | १ | ३ | - | ४ | १ | ३३ | ६० |
| २३ | फेडरेशन | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ४ | १ | १ | २ | १२ |
| | | २७४ | ३४७ | २४५ | २८२ | ६४ | ११९३ | ४७१ | ५०३ | ४०९ | १९४ | ४७३ | ७०९ | ८६१ | ६०२५ |
| ब) | पशुसंवर्धन दुध व मत्स्य संस्था | | | | | | | | | | | | | | |
| २४ | मध्यवर्ती दुध पुरवठा संस्था | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | - | १ | - | ३ |
| २५ | प्राथमिक दुध पुरवठा संस्था | १७७ | २३२ | २४० | १९६ | ४० | १९० | २२५ | २६६ | ३०८ | १८३ | १६७ | ३३४ | - | २५५८ |
| २६ | पशुसंवर्धन व पशुउत्पन्न सं. | ११ | ४९ | १४ | २२ | ४ | २१ | ३३ | ३२ | ४२ | ४ | १२ | २० | - | २६४ |
| २७ | प्राथ. संस्था व कुक्कुटपालन | - | १३ | २ | ३ | - | २७ | ३ | ७ | ३ | १ | २ | ४ | - | ६५ |
| २८ | मच्छिमार संस्था | १ | २ | १ | २ | - | - | ४ | ६ | २ | १ | ४ | २ | १ | २२ |
| | | १८९ | २९६ | २५७ | २२३ | ४४ | २४० | २६५ | ३०६ | ३५५ | १८९ | १८५ | ३६२ | १ | २९१२ |

**एकूण अ + ब = ८९३७**

<u>सारणी क्रमांक १.४ चा आधार</u> :

१) मा. चंद्रकांत जोती वाडेकर : "कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ", "सांख्यिकी माहिती पुस्तिका सन १९९९", कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बोर्ड लि. कोल्हापूर, पान नं. २२,२३.

सारणी क्रमांक १.४ वरून असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्ह्यातील १२ तालुक्यांमध्ये ३१ मार्च, १९९९ एकूण ८,९३७ इतक्या सहकारी संस्था आहेत.[१७]

या पार्श्वभूमीवर, वारणानगरमधील सहकारी संस्थांचा अल्प परिचय आपण यापुढील प्रकरणात करून घेणार आहोत.

## * संदर्भ *


१) Baviskar, B. S. : "The Politics of Development : Sugar Co-operatives in Rural Maharashtra", 1980, Oxford University Press, p.p.1 & 2.

२) David L. Sills : "International Encyclopaedia of the social sciences", Vol-3, The Macmillan Company, 1968, p. 5

३) Dr. Fay, C. R. : "Co-operation at Home and Abroad Vol. I, Quoted from Memoria C. B., "Co-operation in India, Allahabad 1973, p. 86.

४) Dr. Mathur, B. S. : "History and Growth of the Co-operative movement in India", "Co-operation in India", (A critical analysis of co-operative movement in India's planned economy), Sahitya Bhavan Agra, 1977, p.p. 65-66.

५) Dr. Mathur, B. S. : "History and growth of Co-operative movement in India", "Co-operation in India", Sahitya Bhavan, Agra, 1977, p.p. 68,69.

६) Dr. Memoria, C. B. : "History and growth of Co-operative movement in India", "Co-operation in India", Kitab Mahal, Allahabad, 1973, p. 127.

७) Hugo F. Reading : "A Dictionary of the social science", Routledge & Kegan Paul, London, 1997, p. 7.

८) Mr. Mehta, V. L. : "Co-operation in India", A Critical analysis of the Co-operative movement in India's planned economy, Quoted from Dr. Mathur, B. S., Sahitya Bhavan, Agra, 1997, p.10.

९) Mr. W. P. Watkins : "Co-operation in India", (A critical analysis of the co-operative movement in India's planned economy), Quoted from Dr.

१०) Mathur B. S. , Sahitya Bhavan Agra, 1997, p. 9.
Tishler, Herry L., Whitten, Philip and Hunter, David : "An Introduction to Sociology", New York, 1983, p. 12.

११) गजरे, अशोकराव : ''महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेप'', सहकारी विश्व विशेषांक, डिसेंबर १९९९ पान नं. ५.

१२) गजरे, अशोकराव : ''सहकारी महाराष्ट्र'', सहकारी सप्ताह विशेषांक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पूणे, नोव्हेंबर, २०००, पान नं. १९ ते ३०.

१३) गजरे, अशोकराव : ''महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेप'', सहकारी विश्व विशेषांक, डिसेंबर १९९९ पान नं. ५.

१४) प्रा. स. वि. सोवनी : ''महाराष्ट्रातील कृषी विकासात प्राथमिक शेती सहकारी संस्थांचे योगदान'', ''अर्थमंथन'', सकाळ प्रिंटीग प्रेस पूणे, वर्ष ९ वे, अंक २२, २ एप्रिल ते ८ एप्रिल २००१, पान नं. १५.

१५) प्रा. स. वि. सोवनी : ''प्राथमिक रोजी सहकारी संस्थांचे महाराष्ट्रातील कृषीविकासात योगदान'', ''अर्थमंथन'', स्काळ प्रिंटीग प्रेस पूणे, वर्ष ९ वे, अंक २१, , संपादक - प्रीकर चिंतामण खोजे, मुद्रक व प्रकाशक - श्रीमती लीला पराडकर, २६ मार्च ते १ एप्रिल २००१ पान नं. १५.

१६) मा. चंद्रकांत जोती वाडेकर (अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा सहकारी बोर्ड, कोल्हापूर) : ''कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ'', ''सांख्यिकी माहिती पुस्तिका सन १९९९'' तसेच ''५३ वा वार्षिक अहवाल सन १९९९-२०००'', कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बोर्ड लि. कोल्हापूर.

१७) यादव, उत्तमराव : ''सहकारातून सर्वांगीण विकास'', सहकारी विश्व विशेषांक, जुन १९९७, पान नं. ११.


*****